MHWS080002652023

म.कौ.हि.सं.अर्ज.क्र.१०/२०२३ मधील निशाणी क्र.५१ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज अर्जदार हिने मूळ अर्जाचे शिर्षकात अर्जदार क्र.०२ म्हणून मुलाचे नाव समाविष्ट करणेबाबत दुरुस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारचे अर्जातील कथनानुसार, प्रस्तुत प्रकरणात अर्जदार क्र.०२ म्हणून शिर्षकात अर्जदार व गैरअर्जदार क्र.०१ यांचा मुलगा नामे सुजय सुरेंद्र खंडारे याचे नाव अर्जदार क्र.०२ म्हणून समाविष्ट करणे नजरचुकीने व अनावधानाने राहून गेलेले आहे. त्यामुळे मूळ अर्जाचे शिर्षकात अर्जदार क्र.०२ चे नाव समाविष्ट करणे गरजेचे आहे. सदरची दुरुस्ती सौम्य स्वरुपाची असून मूळ अर्जात तसेच अर्जाचे विनंतीत अर्जदार क्र. ०२ च्या नावाचा वेळोवेळी उल्लेख केलेला असल्याने सदरच्या दुरुस्तीमुळे गैरअर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर झाल्यास अर्जदाराचे व तिच्या मुलाचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार असल्याने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

३. सदर अर्जावर गैरअर्जदारातर्फे म्हणणे दाखल करुन अर्जातील दुरुस्तीचे कारण संयुक्तीक नसल्यामुळे अर्ज नामंजूर करावा असे नमूद करुन मंजूर केल्यास र.रु. ३००/— इतका दंड अर्जदारास करावा असे कथन केलेले आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन करता प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाअंतर्गत दाखल केलेला आहे. अर्जदाराचे मूळ अर्जाचे अवलोकन करता परिच्छेद क्र.०३ मध्ये अर्जदारास गैरअर्जदार क्र.०१ पासून सुजय नावाचा मुलगा झाल्याचे कथन केलेले असून मूळ अर्जाचे विनंती कलमातील मुलगा सुजय याचे उदरनिर्वाहाकरिता दरमहा रकमेची मागणी केल्याचे दिसून येते. गैरअर्जदार यांनी नि.क्र.२९ वर आपले लेखी म्हणणे दाखल केले असून त्यामध्ये जरी मुलगा सुजय हा गैरअर्जदार क्र.०१ पासून झालेला मुलगा असल्याचे नाकारले असले तरी त्यासंदर्भाने आवश्यक तो पुरावा दाखल

करण्याची मुभा गैरअर्जदार यांना मिळणार आहे. अर्जदार हिचे मुळ अर्जातील कथन व विनंती पाहता तसेच कागदयादी नि.क्र.४८ सोबत अनुक्रमांक ०४ वरील मुलगा सुजय याचे मूळ जन्म प्रमाणपत्र पाहता प्रथमदर्शनी मुलगा सुजय हा अर्जदार व गैरअर्जदार क्र.०१ यांचा मुलगा असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार हिने प्रस्तुत अर्जात मागितलेली दुरुस्ती मंजूर करणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आवश्यक असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१.	अर्जदारचा अर्ज निशाणी क्र. ५१ मंजुर करण्यात येत आहे.
२.	अर्जदार हिने प्रस्तुत अर्जात प्रस्तावित केलेली दुरुस्ती मूळ अर्जात करुन अर्जदार क्र.०२ यास मूळ अर्जाचे कामी या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत समाविष्ट करावे व तशी मूळ अर्ज दुरुस्ती प्रत या कामी सादर करावी.
३.	खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2025.02.06 17:30:27 +0530

(पी.व्ही. सपकाळ)

दिनांक ०६.०२.२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer	:	H. A. Uchade.
Name of court	:	C.J.J.D.& JMFC;Risod
Date	:	06.02.2025
Judgment/Order signed by the Presiding Officer	:	06.02.2025
Judgment/Order uploaded on	:	06.02.2025